तातडीचे / कालमर्यादित

जा.क्र./मरापप/जीसीसी/प्रशा/सं.टा./२०१७/ 4396
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
१७, डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे-०१
दिनांक : 27/०७/ २०१७

प्रति,

संस्थाचालक / प्राचार्य,
शासनमान्य संगणक टायपिंग संस्था,
महाराष्ट्र व गोवा राज्य.

**विषय** :- शासकीय सगंणक टंकलेखन प्रमाणपत्र परीक्षा (GCC-TBC) ऑगस्ट २०१७ परीक्षा केंद्र निवडणेबाबत.

**संदर्भ** :- १. जीसीसी टीबीसी परीक्षा ऑगस्ट २०१ रोजीची अधिसूचना
२. या कार्यालयाचे जा.क्र.मरापप/जीसीसी/प्रशा/२०१७/४३३८ दि.२५/०७/२०१७

उपरोक्त विषयान्वये कळविण्यात येते की, शासकीय संगणक टंकलेखन प्रमाणपत्र परीक्षा एकूण सुमारे २२९ केंद्रावर ऑनलाईन पद्धतीने घेण्यात येणार आहे. दि. १८ ऑगस्ट ते दि. २४ ऑगस्ट २०१७ या कालावधीत इंग्रजी ३० च ४० श.प्र.मि. या विषयाची ऑनलाइंन परीक्षा घेतली जाईल. तर मराठी/हिंदी ३० व ४० श.प्र.मि. या विषयांची ऑनलाईन परीक्षा दि.२८ऑगस्ट ते १ सप्टेंबर २०१७ या कालावधीत घेतली जाईल.

**१.** संदर्भ क्र.२ नुसार दि. २६/०७/२०१७ रोजी संस्थांनी केलेली केंद्रांची निवड रद्द करण्यात आली आहे. त्यामुळे शासकीय संगणक टंकलेखन प्रमाणपत्र परीक्षा ऑगस्ट २०१७ (GCC-TBC) ३० व ४० श.प्र.मि. साठी पुन्हा नव्याने परीक्षा केंद्र सर्वच संस्थाचालकांनी निवडावे.

**२.** ज्या तालुक्यात परीक्षा केंद्र उपलब्ध आहे त्या तालुक्यातील संस्थानी आपल्या तालुक्यातीलच परीक्षा केंद्राची निवड करावी. परीक्षा केंद्राच्या ड्रापडाऊन लिस्टमध्ये आपल्या तालुक्यातील परीक्षा केंद्र नसल्यासच आपल्या जिल्ह्यातील जवळचे अन्य परीक्षा केंद्र निवडावे.

**३.** संस्था ज्या तालुक्यात आहे, त्या तालुक्यात परीक्षा केंद्र उपलब्ध असताना दुसऱ्या तालुक्यातील परीक्षा केंद्र निवडल्यास परीक्षा परिषदेकडून अशा संस्थांची केंद्र निवड रद्द करण्यात येईल. पर्यायाने त्या संस्थेतील परीक्षार्थ्यांची परीक्षा घेतली जाणार नाही.

**४.** ही परीक्षा केंद्र निवड इंग्रजी ३०, ४० श.प्र.मि. परीक्षेसाठी असेल. मराठी/हिंदी ३०, ४० श.प्र.मि. साठी संस्थानी इंग्रजीसाठी निवडलेल्या केंद्रावर क्षमता उपलब्ध नसेल तर, परिषदेकडून उपलब्ध असलेले जवळचे परीक्षा केंद्र देण्यात येईल. (म्हणजेच मराठी/हिंदी GCC-TBC ३०, ४० श.प्र.मि. परीक्षेसाठी संस्थांना केंद्र निवडीसाठी पर्याय उपलब्ध करुन दिला जाणार नाही.)

**५.** केंद्र निवडीबाबत संदर्भ क्र. २ मधील सूचनाही लक्षात घ्याव्यात.

**६.** दि. २८/०७/२०१७ ते २९/०७/२०१७ चा कालावधीत परीक्षा केंद्र निवडीची Link उपलब्ध राहील. त्यानुसार या विहित मुदतीत परीक्षा केंद्र निवड संस्थांनी Login द्वारे ऑनलाईन पध्दतीने करावी.

**७.** केंद्रनिवडीबाबत टपालाने, ई-मेलने पत्रव्यवहार करु नये.

(सुखदेव डेरे)
आयुक्त
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे

प्रत :- १. शिक्षणाधिकारी (माध्य) सर्व
२. शिक्षण निरीक्षक मुंबई (उ/द/प)